# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात महानगरपालिका तसेच एमएमआरडीए च्या माध्यमातून शहरातील बहुतांश ठिकाणी सीसी रोडचे कार्य प्रगतीपथावर आहे. शहरातील सर्व रस्ते नागरिकांना वाहतुकीसाठी सोयीस्कर करण्यासाठी महापालिकेचे युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी शहरात सुरू असलेल्या सर्व रस्त्यांच्या कामाची पाहणी केली.

घोडबंदर येथील अदाणी पॉवर हाऊस येथील रस्त्याची मा. आयुक्त यांनी पाहणी केली असता सदर रस्त्यावर नागरिकांना वाहतुकीसाठी अडचण होत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. रस्त्यावरील एक बाजू ही सीसी स्वरूपात असून उर्वरित बाजूचे काम सुरू होते. मा. आयुक्त यांनी तातडीने सार्वजनिक बांधकाम विभागाचे शहर अभियंता दिपक खांबित, कार्यकारी अभियंता व कनिष्ठ अभियंत्यांना सदर रस्ता हा तात्पुरत्या स्वरूपात दुरुस्त करून करण्याचे निर्देश दिले. मा. आयुक्त यांच्या निर्देशानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने २४ तासांच्या आत सदर रस्त्यावर खडी व रोड रोलरच्या साहाय्याने तात्पुरत्या स्वरूपात वाहतुकीसाठी रस्त्याचे कार्य पूर्ण केलेले आहे. सदर रस्ता सीसी रस्त्यामध्ये लवकरात लवकर पूर्ण करण्याचे कार्य महानगरपालिका करणार आहे.